JD

जा.क्र. जिपास्वमिक/आस्था/आरआर/ २५५ /२०१८
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,जिल्हा
परिषद जळगांव. दिनांक २१/८ /२०१८

प्रति,
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद जळगांव

**विषय :- जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जि.प.जळगांव या विभागातील कंत्राटी व हंगामी पदे भरती बाबत जाहिरात जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बाबत.**

उपरोक्त विषयान्वये सादर करणेत येते की, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षांतील २ रिक्त असलेली कंत्राटी व हंगामी पदे भरती बाबतची कार्यवाही करावयाची असल्यामुळे आपण जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर सोबत दिलेली जाहिरात प्रसिध्द करावी.

**सोबत :- जाहिरातीचे प्रारुप**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पावस्व)
जिल्हा परिषद जळगांव.

प्रत:- श्री राजेश चव्हाण , संगणक ऑपरेटर, व्हि.सी.रुम जिल्हा परिषद,जळगांव यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना

# जाहिरात

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद अंतर्गत तात्पुरत्या कंत्राटी व हंगामी स्वरुपात अकरा महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रीत मानधनावर खालील पदे भरण्यात येणार आहेत. जाहिरातीत दिलेली अर्हता पूर्ण करित असलेल्या अनुभवी उमेदवारांनी अर्ज अध्यक्ष जिल्हा निवड समिती मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगांव यांच्या नांवे **जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष यांचे कार्यालयात दि. ८/१०/२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस सोडुन आपला अर्ज सादर करावयाचा आहे.** अर्जात नांव (संपूर्ण),जन्मतारीख,शैक्षणिक पात्रता,अनुभव,सेवायोजन कार्यालय नोदणी क्रमांक या बाबींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. अर्जासोबत आवश्यक ती शैक्षणिक व अनुभवाच्या दाखल्याची प्रत जोडावी.

| अ. क्र. | भरती करावयाचे कंत्राटी पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | मानधन वेतन | मोबाईल/ दुरध्वनी भत्ता | प्रोत्साहन भत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **अभियांत्रिकी तज्ञ** जलस्वराज्य-२ **(सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन /पाणी गुणवत्ता तज्ञ) पद संख्या ०१ खुला** | **किमान अर्हता :-**<br>१.बी.टेक/बी.ई.सिव्हील/ एन्व्हॉयरमेंटल इंजिनिअरिंग किंवा मान्यताप्राप्त विद्यापिठाची समकक्ष पदवी<br>२.अनुभव-५ वर्षाचा **आवश्यक** | कलाम वयोमर्यादा ५० वर्षे/सरकारी/ निमसरकारी अधिकारी/कर्मचारी यांचे करीता ६५ वर्षे राहील. | रु.२५००० **दरमहा एकत्रित** | - | - |
| २ | **पाणी गुणवत्ता तज्ञ** (water Quality Monitoring & Surveillance Specialist) **पद संख्या ०१ खुला** | **किमान अर्हता :-**<br>Environmental Chemistry/Analytical Chemistry/Geo- Chemistry/ Microbiology यामधील पदवी<br>प्राधान्य :- M.Sc.in Water Quality Monitoring & Survellance.<br>अनुभव :- **पाणी गुणवत्ता संनियंत्रण व** सर्वेक्षण **यामधील** किमान २ **वर्षाचा** अनुभव<br>*Good knowledge of MS office,Excel,Internet & working experience in water quality testing instrumentation.<br>*Excellent written and oral Communication skill in English, Knowledge of local language is an added advantage. | पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षणाशी संबधीत सर्व बाबी हाताळणे उच्चतम वयोमर्यादा ४० वर्ष राहील. | रु.१५,०००/ **दरमहा** | ६०० दरमहा | ५००० दरमहा |

टिप :- सदरील जाहिरात http://zpjalgaon.gov.in या जि.प. जळगांवचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

सर्व साधारण अटी व शर्ती

१) सदर नेमणुक फक्त ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर करण्यात येईल या सेवेच्या आधारावर नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. असा करारनामा निवड झाल्यावर उमेदवाराने रक्कम रुपये १००/-च्या स्टॅम्प पेपरवर करुन देणे बंधनकारक राहील.

२) नेमणुक कालावधी संपण्यापुर्वी नियुक्ती रद्द करण्याचा अधिकारी तसेच जाहिराती प्रमाणे भरती प्रक्रिया स्थगिती अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगांव यानी राखुन ठेवलेला आहे.

३) अर्जासोबत वर नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या सत्य प्रती जोडणे आवश्यक आहे. उमेदवाराने आपला पत्ता ठळक अक्षरात गांव,तालुका व जिल्हा इ.स्वहस्ताक्षरात नमुद करावा.आवश्यकते नुसार पदसंख्यामध्ये बदल करण्याचे तसेच जाहिरात रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी सो जिल्हा परिषद जळगांव यांनी राखुन ठेवलेले आहे.

४) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक:ग्रापाधो१११०/प्र.क्र.२४६(अ)/पापु-०७ दि.१५ जुलै २०११ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार पाणी गुणवत्ता तज्ञ ,या पदाची निवड प्रक्रिया करण्यात येईल. .

५) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१२/प्र.क्र.७२/पापु-०७ दिनांक १ नोव्हेंबर २०१२,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय मुंबई अन्वये दिलेल्या निर्देशानुसार निवड प्रक्रिया करण्यात येईल.

६) शासन निर्णय जलस्वराज्य-२ कार्यक्रम पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक जस्वप्र-०२१४/प्र.क्र.३४/पापु-११/दिनांक १७ फेब्रुवारी २०१४ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार अभियांत्रिकी तज्ञ,या कंत्राटी पदाची निवड पक्रिया करण्यात येईल.

७) अर्ज सादर करतांना लिफाफयावर पदाचे नांव लिहावे.
सदर अर्जासोबत राष्ट्रीयकृत बँकेचा रक्कम रु.३००/-चा डिमांडड्राफ्ट मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगांव यांचे नांवे असलेला जोडलेला असावा.

८) विहीत नमुन्यातील अर्ज उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पावस्व) तथा संनियंत्रण अधिकारी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद जळगांव (जुनी इमारत) येथे सुटीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत सादर करावे.

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव..

खालील उणिवा असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

१) विहीत शैक्षणिक पात्रता धारन न करणारे
२) दिलेल्या विहित नमुन्यात नसलेले अर्ज
३) अपूर्ण किंवा चुकीचा मजकुर असलेले अर्ज
४) स्वाक्षरी नसलेले अर्ज
५) आवश्यक गुणपत्राच्या व प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती नसलेले अर्ज अगर तत्सम माहिती योग्यरित्या न दर्शविलेले अर्ज
६) फोटो नसलेले अर्ज
७) विहित डि.डि.न जोडलेले अर्ज

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव.

# अर्जाचा नमुना

प्रति,
मा.अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जळगांव

फोटो चिटकवुन स्वतः साक्षांकित करावे

१) पदाचे नांव :-
२) उमेदवाराचे नांव :-
३) पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता :-
४) भ्रमणध्वनी /दुरध्वनी क्रमांक :-
५) जन्म तारीख (अंकात) :-
६) जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांक रोजीचे वय ---------------------महिने --------------------- दिवस
७) शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | परिक्षेचे नांव | संस्था/बोर्ड/विद्यापिठाचे नांव | विषय | परिक्षेत मिळालेले एकूण गुण | एकुण टक्केवारी | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

८) अर्जा सोबत जोडलेल्या साक्षांकीत छायांकीत कागदपत्रांची यादी.
९) डी.डी.चा तपशिल :-
१०)अनुभव :-

## प्रतिज्ञापत्र

मी या अन्वये प्रतिज्ञापुर्वक असे जाहिर करतो/करते की वरील माहिती जाणीव पुर्वक तसेच विचारपुर्वक दिली असुन ती सर्व खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. या पैकी कोणतीही माहिती खोटी असल्यास व त्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतुन कमी केल्यास त्या बाबत माझी काही तक्रार राहणार नाही. या अर्जाव्दारे दिलेली माहिती खोटी आढळल्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगांव माझे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करु शकता याची मला पुर्णपणे जाणीव आहे.

ठिकाण :-
दिनांक :-

आपला विश्वासू

(-------------------------------)